MHKO070012942014

**<u>रे.क.नं.२२५/२०१४</u>**

**सुनंदा रामगोंडा बलोल**

**<u>विरुध्द</u>**

**सुवर्णा रायगोंडा आलमाने आणि इतर**

<u>नि.क्र.७३ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे प्रतिवादी नं.१६ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, सदरचे काम प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१६ पासगोंडा देवगोंडा पाटील हे दि.११/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. ते मयत झालेबाबतची माहिती वादी यांना नव्हती. त्यानंतर प्रतिवादीतर्फे दि.०७/०८/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१६ हे मयत झालेबाबतची पुरसीस दाखल केली. त्यावेळी वादी यांना प्रतिवादी क्र.१६ हे मयत झाल्याचे समजले. त्यानंतर प्रतिवादी क्र.१६ यांच्या वारसांची माहिती घेणेस कालावधी लागला, तसेच माहिती घेवुन वेळेत वकीलांची भेट घेता आली नाही. तसेच वादी यांना कोर्ट प्रोसिजरची माहिती नसल्याने मुदतीत वारसांची तजवीज करता आली नाही. तदनंतर प्रस्तुत वारसांची माहिती मिळाल्याने त्यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने सदर अर्जावरच म्हणणे देण्यात आले आहे की, वादीने अर्जामध्ये कोणतेही संयुक्तीक व पुरेसे कारण नमुद केलेले नाही. प्रस्तुत प्रतिवादी मयत झालेचे वादीला पुर्वीपासुन माहित होते. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप, कब्जा व हक्कज्ञापनासाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे.

प्रतिवादी नं.१६ चे वारस म्हणून त्यांचे विरुध्द दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र.७४ ला प्रतिवादी नं.१६ विरुध्द अबेटमेंटचा आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. तो अर्ज खर्चासह मंजुर करण्यात आलेला आहे.वादीतर्फे नि.क्र.७२ सोबत सदर प्रतिवादीचे मृत्यू प्रमाणपत्र हे दाखल करण्यात आलेले आहे. अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.७३) हा नि.क्र.७४ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजुर समजण्यात यावा.

२. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.10.01 15:53:46 +0530

दि.०१/१०/२०२५ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 01/10/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 01/10/2025. |
| Judgment/order uploaded on | 01/10/2025. |